प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO
WE MAKE CITIES
सिडको
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd /cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ०४.१०.२०२२**

**सिडकोच्या महागृहनिर्माण योजना ऑगस्ट-२०२२ करीता अर्ज नोंदणीस ०३ नोव्हेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ**

**तसेच वाणिज्यिक गाळे व रेल्वे स्थानक संकुलांतील वाणिज्यिक जागांच्या विक्री योजनेच्या अर्ज नोंदणीस ०६ नोव्हेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ**

नागरिकांच्या उस्फूर्त प्रतिसाद आणि मागणीमुळे सिडको महामंडळाच्या ४,१५८ घरांच्या ऑगस्ट-२०२२ महागृहनिर्माण योजनेकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्यासाठी, ०३ नोव्हेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोने घेतला असून या अनुषंगाने अनामत रक्कम व शुल्क भरणा, संगणकीय सोडत या प्रक्रियांनाही मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर योजनेकरिता अर्ज करण्यास ०३ ऑक्टोबर २०२२ ही अंतिम तारीख होती. परंतु, अधिकाधिक नागरिकांना योजनेचा लाभ घेता यावा, याकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणीस ०३ नोव्हेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. तसेच सिडकोच्या विविध गृहनिर्माण योजनांतील वाणिज्यिक गाळयांच्या आणि नवी मुंबईतील रेल्वे स्थानक संकुलांतील वाणिज्यिक जागांच्या विक्री योजनेकरिता ऑनलाइन अर्ज करण्यासही ०९ नोव्हेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनेकरिता अर्ज नोंदणी करण्यास ०६ ऑक्टोबर २०२२ ही अंतिम तारीख होती.

सिडको महामंडळातर्फे ३१ ऑगस्ट २०२२ रोजी ऑगस्ट-२०२२ महागृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईतील द्रोणागिरी, कळंबोली, तळोजा आणि खारघर नोडमधील सिडकोच्या गृहसंकुलांतील ४,१५८ घरे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. परवडणाऱ्या दरातील या ४,१५८ घरांपैकी ४०४ घरे ही प्रधानमंत्री आवास योजनेंतर्ग आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आणि उर्वरित ३,७५४ घरे ही सर्वसाधारण प्रवर्गाकरिता उपलब्ध आहेत. तसेच अन्य योजनेंतर्गत सिडकोच्या विविध गृहनिर्माण योजनांतील २४५ वाणिज्यिक गाळे आणि नवी मुंबईतील रेल्वे स्थानक संकुलांतील ६ वाणिज्यिक जागा विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

सुधारित वेळापत्रकाप्रमाणे महागृहनिर्माण योजना ऑगस्ट-२०२२ करीता ऑनलाइन अर्ज नोंदणी ०३ नोव्हेंबर २०२२ पर्यंत करता येणार आहे. ऑनलाइन अर्ज ०४ नोव्हेंबर २०२२ पर्यंत सादर करता येणार आहेत.

ऑनलाइन शुल्क भरणा ०७ नोव्हेंबर २०२२ पर्यंत करता येणार आहे. स्वीकृत अर्जदारांची प्रारुप यादी १४ नोव्हेंबर २०२२ रोजी तर स्वीकृत अर्जदारांची अंतिम यादी १८ नोव्हेंबर २०२२ रोजी सिडकोच्या https://lottery.cidcoindia.com/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. योजनेची संगणकीय सोडत २२ नोव्हेंबर २०२२ रोजी पार पडणार आहे.

सुधारित वेळापत्रकाप्रमाणे सिडको गृहनिर्माण संकुलांतील वाणिज्यिक गाळे आणि रेल्वे स्थानक संकुलांतील वाणिज्यिक जागांच्या विक्री योजनेकरिता ऑनलाइन अर्ज, अनामत रक्कम व प्रक्रिया शुल्क भरणा ०९ नोव्हेंबर २०२२ पर्यंत करता येणार आहे. बंद निविदा ०८ नोव्हेंबर २०२२ पर्यंत सादर करता येणार आहेत. ई-लिलाव ०९ नोव्हेंबर रोजी पार पडून ११ नोव्हेंबर २०२२ रोजी निकाल घोषित करण्यात येणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

जनसंपर्क विभाग, सिडको